3

# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED & MULTILINGUAL STUDIES

UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Volume V
Issue II

ISSN : 2394-207X (Print)
IMPACT FACTOR : 4.205

February 2018

A Galaxy of Scholarly Written Research Papers/Articles

IJMMS

Cosmos

Chief Editor
Dr. V. H. Mane

Executive Editor
Prof. M. P. Shaikh

www.ijmms.in

Email : ijmms14@gmail.com

| | | | |
|---|---|---|---|
| 35 | CULTURAL CONFLICT IN KIRAN DESAI'S *"THE INHERITANCE OF LOSS"* | Prof. Pranjali B. Vidyasagar | 144-147 |
| 36 | Literary Theory in Practice: A Case of Arun Kolatkar's Jejuri in light of Intentional Fallacy | Parag Prakash Chaudhari | 148-151 |
| 37 | Impact of ICT on College Libraries | Mr. Sumedh S.Gajbe | 152-154 |
| 38 | महाराष्ट्रातील कृषी विकास आणि पिकरचनेतील बदलत्या प्रवृत्ती | प्रा. डॉ. सोमनाथ वसंतराव पाटील | 155-158 |
| 39 | हरितगृह शेती तंत्राचे अर्थशास्त्र | प्रविण भाऊसाहेब विखे १<br>प्रा. डॉ. एस. जी. शिंदे २ | 159-162 |
| 40 | ग्रामीण विकासात स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका (महाराष्ट्राचा विशेष संदर्भ) | प्रा. डॉ. बोरावके के. एस्. | 163-165 |
| 41 | विविध कार्यकारी सेवा सहकारी पत संस्थांचे ग्रामीण विकासातील योगदान ( विशेष संदर्भ :कर्जत तालुका, सन १९९९—०० ते २००८—०९ ) | प्रा.डॉ.सचिन रमेश तोरडमल | 166-168 |
| 42 | भारतातील टोमॅटो उत्पादन व विपणन विषयक समस्या व उपाययोजना | प्रा. साहेबराव दौलत निकम | 169-171 |
| 43 | कृषि व ग्रामिण विकासात नाबार्डची भुमिका | प्रा.वासनीकर शामराव लक्ष्मण | 172-173 |
| 44 | महाराष्ट्रातील शेती: सद्यस्थिती, समस्या आणि आव्हाने | प्रा. डॉ.हनुमंत पोपट शिंदे | 174-180 |
| 45 | मानव अधिकार आणि भारतीय शेतकऱ्यांची सद्यस्थिती | प्रा.डॉ.अंकुश दादाराव काळे | 181-184 |
| 46 | भौगोलिक घटकांचा महाराष्ट्रातील शेतीच्या शाश्वतीकरणावर होणा-या परिणामांचा अभ्यास | प्रा.डॉ. रविंद्र सुदाम भगत | 185-188 |
| 47 | हिंदी कथा साहित्य में समाज एवं संस्कृति | डॉ. बेबी कोलते | 189-191 |
| 48 | समकालीन हिंदी कहानी में चित्रित नारी जीवन | प्रा. नानासाहेब जावळे | 192-195 |
| 49 | फणीश्वरनाथ 'रेणु' की कहानियों में ग्रामीण समाज एवं संस्कृति | डॉ. मनोहर जमदाडे | 196-198 |
| 50 | 'हिंदी कथा साहित्य में समाज एवं संस्कृति' (मोहनदास नैमिशराय कृत'महाशुद्र'के संदर्भ में) | डॉ. वंदना तुकाराम काटे | 199-201 |
| 51 | हिंदी आलोचना का विकास एवं स्त्री विमर्श | प्रा.डॉ. भगत सारिका | 202-203 |
| 52 | आलोचना उद्‌भव और विकास | प्रा.नामदेव शितोळे | 204-207 |
| 53 | साहित्य एवं आलोचना : पुनर्विचार की आवश्यकता | डॉ. राजेन्द्र खैरनार | 208-211 |
| 54 | Agriculture Planning of Gondia District in Maharashtra State | [1]Dr. Devendra K. Bisen<br>[2]Prof.Hanumant Dattatraya Shinde | 212-214 |

# महाराष्ट्रातील शेती: सद्यस्थिती, समस्या आणि आव्हाने

**प्रा. डॉ.हनुमंत पोपट शिंदे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
प्रितम प्रकाश महाविद्यालय, इंद्रायणीनगर,भोसरी, पुणे-३९.

**गोषवारा:**

*महाराष्ट्रात शेतीचे लागवडीखालील क्षेत्र व निव्वळ पेरणी क्षेत्र मोठे असले तरी जलसिंचनाचे प्रमाण फारच कमी असून जलसिंचन क्षेत्राच्या बाबतीत राज्याची स्थिती फारच दयनिय आहे. जमिनीच्या तुकडीकरणामुळे राज्यातील धारणक्षेत्राचे आकारमान वेगाने घटत असुन त्यामुळे जलसिंचन सुविधांचा विकास, आधुनिक यंत्रसामग्री व तंत्रज्ञानाचा वापर यावर मर्यादा येत आहेत. राज्यात पायाभूत सुविधांचा पुरेशा प्रमाणात विकास झाला असला तरी वीज टंचाई, रासायनिक खतांचा अपुरा पुरवठा, ग्रामीण भागात बँकिंग सुविधांची कमतरता, कृषी विपणनातील दोष, वाहतुक-दळणवळणाच्या अपुऱ्या सुविधा, तांत्रिक सल्ला व मार्गदर्शनाचा अभाव, शेतकरी आत्महत्या ही राज्यातील शेतीसमोर निर्माण झालेली आव्हाने आहेत. देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील सर्वच पिकांचे उत्पादन व उत्पादकता फारच कमी असून तेलबिया व ऊसाचा अपवाद वगळता राज्यातील तृणधान्ये, कडधान्ये व कापसाची सरासरी उत्पादकता ही देशातील सरासरीपेक्षाही कमी आहे. यावरून महाराष्ट्र राज्याने औद्योगिक विकासात देशपातळीवर नेत्रदिपक प्रगती केली असली तरी राज्यातील कृषी क्षेत्राचा फारसा विकास झाला नसल्याचे दिसुन येते.त्यामुळे शेती व शेतकऱ्यांच्या समस्या आणि विकासासंबंधी सखोल अध्ययनाची गरज निर्माण झाली आहे. त्या दृष्टीने महाराष्ट्रातील शेतीची सद्यस्थिती, राज्यातील शेती क्षेत्राशी संबंधीत प्रमुख निर्देशांक,प्रमुख पिकांच्या उत्पादकतेतील प्रवृत्ती,कृषी आदाने व पायाभूत संरचनेची उपलब्धता, शेतीच्या विकासातील अडथळे व समस्या, कृषी क्षेत्रातील समस्या दूर करण्यासाठीच्या उपाययोजना या सर्व बाबींचे विस्तृत अध्ययन करण्यासाठी प्रस्तुत शोध निबंधाची निवड केली आहे.*

**कळीचे शब्द:** महाराष्ट्रातील शेती, पायाभूत संसाधने, उत्पादकता, जलसिंचन, धारण क्षेत्र.

**१. प्रास्ताविक** स्वातंत्र्यानंतर १९५७ मध्ये भारतात घडून आलेल्या भाषावार प्रांत-रचनेच्या माध्यमातून १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ हे ३,०७,६९० चौ.कि.मी. असून क्षेत्रफळाबाबत राज्याचा देशात दुसरा क्रमांक लागतो. सध्या राज्यात ३५ जिल्हे असून ३५७ तालुके आहेत. महाराष्ट्र राज्य हे देशाच्या पश्चिम सीमेवर असून राज्याला ७२० कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. प्रशासकिय सोई साठी राज्यातील प्रशासनाचे ६ विभाग पाडले आहेत. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असून तीला देशाची आर्थिक राजधानी म्हणुनही संबोधले जाते. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ११.२४ कोटी असून ती देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३ टक्के इतकी आहे. राज्यातील ५५ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करत असून शेती हा येथील प्रमुख व्यवसाय आहे. प्रस्तुतअभ्यासात महाराष्ट्रातील शेतीची सद्यस्थिती, राज्यातील शेती क्षेत्रासमोर निर्माण झालेल्या समस्या व आव्हाने यांचा आढावा घेतला असून शेतीच्या समस्या सोडविण्यासाठी काही धोरणात्मक उपाययोजना सूचविल्या आहेत.

**२. अभ्यासाची उद्दिष्टे**

१. महाराष्ट्रातील शेतीची सद्यस्थिती व विविध पिकांच्या उत्पादकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.
२. राज्यातील शेती क्षेत्रासमोर असलेल्या समस्यांचा आढावा घेणे.
३. महाराष्ट्रातील शेती क्षेत्रासमोरील समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**३. अभ्यास पद्धती** सदर शोध निबंध लिहिण्यासाठी प्रामुख्याने द्वितीय स्त्रोतांद्वारे प्राप्त केलेल्या माहिती व आकडेवारीचा वापर केला आहे. द्वितीय स्त्रोतांद्वारे माहिती व आकडेवारी विविध संदर्भग्रंथ, नियतकालिके, भारताची आर्थिक सर्वेक्षणे (Economic Survey of India: 2016-17),महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१६-१७, इ. स्त्रोतांमधून संकलित करण्यात आली आहे. तसेच शेतकरी आणि कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या अभिप्रायांची दखल अभ्यासात